**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक १८ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **देशाचं संरक्षण उत्पादन क्षेत्र आत्मनिर्भर बनवणं हे सरकारचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांचं नागपुरात प्रतिपादन.**
2. **'ॲडव्हांटेज विदर्भ - खासदार औद्योगिक महोत्सव' नागपूर मध्ये येत्या 6 ते 8 फेब्रुवारी दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ परिसरात आयोजित केला जाणार.**
3. **जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत सहभागासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसला रवाना.**

   **आणि**
4. **न्यूझीलंड विरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारतापुढे विजयासाठी ३३८ धावांचं लक्ष्य.**

**आता सविस्तर बातम्या .......**

राजनाथ सिंग

देशाचं संरक्षण उत्पादन क्षेत्र आत्मनिर्भर बनवणे हे आमचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादन केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज नागपुरात केलं. कोंढाळी मार्गावरील शिवा- सावंगा परिसरातील सोलर इंडस्ट्रीज द्वारा स्थापित मिडीयम कॅलिबर अम्युनिशन फॅसिलिटी येथे राजनाथ सिंह यांच्या उपस्थिती पिनाका गायडेड रॉकेटचं पहिलं उत्पादन पाठवण्यात आलं. त्यासाठी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

***और यह भी महसूस होता है कि देश के लिए कुछ बन रहा है। देश के लिए कुछ हो रहा है तो मन में स्वाभाविक है भारत का नागरिक मैं भी हूँ डिफेन्स मिनिस्टर की बात छोड़िये, मन में प्रसन्नता होती है और ये सब देखने के बाद एक डिफेन्स मिनिस्टर के रूप में मुझे लगता है कि हम सही दिशा में आगे बढ़ रहे है, और साथियों जब मैं किसी प्राइवेट सेक्टर यूनिट के इस स्तर पर काम***

*करते हुए देखता हूँ तो मुझे सिर्फ कोई यूनिट या कोई फैसिलिटीज नहीं दिखती बल्कि मुझे एक नया संकल्प दिखता है, एक नया जोश दिखता है, एक नई ऊर्जा दिखती है और साथ ही साथ जो मैंने देखा है। इनोवेशन, नवाचार भी दिखता है और डिफेन्स सेक्टर को हम सब आत्मनिर्भर बनाना चाहते हैं हमारे प्रधानमंत्रीजी बार बार इसका आग्रह करते हैं।*

यावेळी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे देखील उपस्थित होते.
'ॲडव्हांटेज विदर्भ २०२६
विदर्भातील नैसर्गिक संसाधनं, कृषी क्षेत्र आणि कृषी आधारित उद्योग तसंच सेवा क्षेत्र यांचं व्यवस्थापन करून विदर्भात भांडवली उद्योग स्थापन करून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल, असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट यांच्या वतीने 'ॲडव्हांटेज विदर्भ २०२६- खासदार औद्योगिक महोत्सव' नागपूर मधे येत्या 6 ते 8 फेब्रुवारी दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ परिसरात आयोजित केला जाणार आहे. याची माहिती देण्यासाठी आयोजित केलेल्या वार्ताहर परिषदेत ते आज नागपुरात बोलत होते.

*हर चीज़ में फिशिंग में मुझे बता रहे थे कुछ हुआ है पर बहुत कुछ करना है, 6 हजार मालगुजारी तालाब है। हम पूरा एक्सपोर्ट करना चाहते हैं फिश को तो अब हमने ये करना है की हमारे विदर्भ की स्ट्रेंथ और वीकनेस इसको अध्ययन करके हमें ढूंढना पड़ेगा क्या करना है तो, मैं आप सब को जो मालूम हो गया । नागपुर की प्रसिद्धि ऑरेंज सिटी और टाइगर कैपिटल नहीं थी। नागपुर की प्रसिद्धि, हैंडलूम हातमात और पावरलूम और अब सब व्यवसाय खत्म हो गया। फिर ये देखते हुए मैंने धापेवाड़ा में काम शुरू किया और अभी तक तो तीन चार हजार महिलाओं को ट्रेनिंग की। इतनी कोंसे की सुंदर साड़ी बनायीं। हम लोग अभी हैंडलूम का कपड़ा एक्सपोर्ट करने के लिए एक्सपोर्टर लाये थे और अभी हमने जो साड़ियां तैयार की है वो ऐसी है की उसकी वेटिंग लिस्ट है।*

ॲडव्हांटेज विदर्भ अंतर्गत ३५० हून अधिक स्टॉल्सचं औद्योगिक प्रदर्शन भरवण्यात येणार असून त्यामध्ये १०० MSME चे स्टॉल्स तसंच विदर्भातील

विविध जिल्ह्यांचे ४० स्टॉल्स असतील. या कॉन्क्लेव्हमध्ये २५ पेक्षा अधिक सत्रांमध्ये २२५ तज्ज्ञ वक्ते, अंदाजे ५,५०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होतील. तसंच जागतिक गुंतवणूकदारां सोबत 20 पेक्षा अधिक द्विपक्षीय व्यापार बैठका आयोजित केल्या जाणार आहेत.

फडणवीस दावोस

स्वित्झर्लंडमध्ये उद्यापासून सुरु होत असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दावोस इथं पोहोचले. या परिषदेदरम्यान, जागतिक उद्योग गट, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी चर्चा करून महाराष्ट्रात थेट परकीय गुंतवणूक, औद्योगिक प्रकल्प, रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देण्यावर विशेष भर दिला जाईल. भारताचं विकास इंजिन म्हणून जागतिक मंचावर 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' अभियानाचा पुरस्कार करण्याचा संकल्प असल्याचं मुख्यमंत्री कार्यालयाच्या पत्रकात म्हटलं आहे. २३ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या परिषदेत ३ हजारापेक्षा जास्त जागतिक नेते सहभागी होणार आहेत. 'ए स्पिरिट ऑफ डायलॉग' ही यंदाच्या परिषदेची संकल्पना आहे.

हर्षवर्धन सपकाळ

महापालिका निवडणुकीत काँग्रेसनं कोणतीही तडजोड न करता वैचारिक लढा दिला असं प्रतिपादन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलं. मुंबईत काँग्रेस नेत्यांसोबतच्या बैठकीनंतर ते माध्यमांशी बोलत होते.

***मी महाराष्ट्रातल्या तमाम जनतेचे, 288 नगरपालिका नगरपंचायतीच्या माध्यमातून तथा 29 महानगरपालिकाच्या माध्यमातून महाराष्ट्रातला सर्वात मोठा विरोधी पक्ष या भूमिकेतून काँग्रेस पक्षाला जो म्यांडेड दिला आहे त्याची जबाबदारी पूर्णपणे स्वीकारू कुठल्याही प्रकारची वैचारिक, व्यवहारी तडजोड न करता नैतिक लडा हा शब्द आणि अहिंसेच्या माध्यमातून आम्ही लढत राहू.***

आगामी जिल्हा परिषद निवडणूकही शक्य असेल तिथं समविचारी पक्षांना सोबत घेवून लढू. मात्र, कोणत्याही परिस्थितीत भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि

अजित पवारांच्या राष्ट्रवादी सोबत आम्ही जाणार नाही असं सपकाळ यांनी स्पष्ट केलं. अहिल्याबाई होळकर यांनी वारासणीत बांधलेल्या मणि कर्णिका घाटावर सरकारनं बुलडोझर चालविला असून घाटावरील अनेक दैवतांच्या मूर्ती उध्वस्त झाल्या आहेत. याप्रकरणी सरकारन माफी मागावी अन्यथा काँग्रेस पक्ष थेट काशीत आणि महाराष्ट्रभर आत्मक्लेश आंदोलन करणार असल्याचा इशारा देखील काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज पत्रकार परिषदेत दिला.

पंतप्रधान

आसाममधे ६ हजार ९५० कोटी रुपये खर्चाच्या काझीरंगा उन्नत मार्ग प्रकल्पाचं भूमीपूजन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. नगाव जिल्ह्यात कालियाबोर इथं झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी कालियाबोरचं ऐतिहासिक महत्त्व सांगितलं. जैवविविधता आणि निसर्ग संवर्धनासाठी ओळखलं जाणारं काझीरंगा अभयारण्य भारताचा महान वारसा आहे असं ते म्हणाले.

***2013 और 14 में एक सींग वाले दर्जनों राइनो मारे गए। भाजपा सरकार ने तय किया था अब ऐसा नहीं चलेगा। हमने इसके बाद सुरक्षा व्यवस्था को नए सिरे से मजबूत किया। वन विभाग को आधुनिक संसाधन मिले वन दुर्गा के रूप में महिलाओं की भागीदारी बढ़ाई गई। इसका सुखद परिणाम भी सामने आया, 2025 में राइनो के शिकार की एक भी घटना सामने नहीं आई है।***

पंतप्रधान सध्या आसाम आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर असून ३ हजार २५० कोटी रुपये खर्चाच्या विविध रस्ते आणि रेल्वे पायाभूत प्रकल्पांचं त्यांनी काल उद्घाटन केलं.

राज पुरोहित निधन

महाराष्ट्र राज्य सरकारमधले माजी मंत्री आणि ज्येष्ठ भाजप नेते राज पुरोहित यांचं यांचं आज निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. त्यांच्यावर मुंबईतल्या एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते, उपचारादरम्यान त्यांचं आज सकाळी निधन झालं. पुरोहित यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात नगरसेवक पदापासून केली. त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेत आमदार आणि राज्य सरकारमधे त्यांनी

मंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली. तसंच ते काही काळ भाजपचे मुंबई अध्यक्षही होते.

प्रजासत्ताक दिन

७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्याकरता नवी दिल्ली सज्ज झाली आहे. या सोहळ्याला युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष **अँटोनियो कोस्टा** आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष **उर्सुला वॉन डेर लेयन** प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कर्तव्यपथावर भारताच्या लष्करी सामर्थ्यासोबतच सांस्कृतिक समृद्धीचे प्रदर्शन होणार आहे. महाराष्ट्राच्या वतीने 'गणेशोत्सव आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेतून साकारलेल्या भव्य चित्ररथाचे संचलन यावेळी होणार आहे.

क्रिकेट

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान ५० षटकांच्या मालिकेतील निर्णायक तिसरा सामना आज इंदूरमधील होळकर मैदानावर आज होत आहे. या सामन्यात न्यूझीलंडने भारतासमोर विजयासाठी ३३८ धावांच लक्ष ठेवलं आहे. पहिला सामना भारतानं जिंकला तर न्यूझीलंडनं दुसरा सामना जिंकून मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे. सुरुवातीला  नाणेफेक जिंकून भारताने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला होता.

हवामान

विदर्भातील किमान तापमानात आज अल्पशी वाढ नोंदवण्यात आली. गोंदिया इथं किमान तापमान ९ पुर्णांक आठ अंश सेल्सिअस इतकं राहिलं.  त्या पाठोपाठ यवतमाळ इथं दहा पूर्णांक चार, नागपूर इथं 11 तर, वर्धा येथे अकरा पूर्णांक पाच अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं. अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशिम इथे किमान तापमान **13** अंशाच्या  वर नोंदवलं गेलं.

*****